**REE/RR**

*प्रकरण क्रमांक :*

म्हाडा
MHADA

*विषय :* मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ मुंबई सोमवार दि. १८.११.२००३ रोजी झालेल्या ९५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

**कार्यालय : मुख्य अधिकारी / मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई**

**विभाग : निवासी कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**

*उपविभाग :*

*मूळ नस्ति क्रमांक :*

*सन २००* *चे प्रकरण क्रमांक :*

# मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई

## सोमवार दि. १७ / ११/ २००३ रोजी झालेल्या ९५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ९५ वी बैठक सोमवार दि. १७/११/२००३ रोजी सकाळी ११.०० वाजता गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृह येथे संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.आमदार श्री. सचिन भाऊ अहिर | सभापती |
| २. | श्री. सुरेश कारंडे | मुख्य अधिकारी |
| ३. | मा.श्री. सचिन मा. सावंत | सदस्य |
| ४. | मा.श्री.विश्वास मोकाशी, | सदस्य |
| ५. | मा. श्री. रघुनाथ थवई | सदस्य |
| ६.. | मा. श्रीमती छाया कल्याणी | सदस्या |
| ७. | मा. श्री. रमेश परब | सदस्य |
| ८. | मा. श्री उस्मान गणी कुरेशी (लालीभाई) | सदस्य |
| ९. | प्रमुख अभियंता, म.न.पा. यांचे प्रतिनीधी | निमंत्रक |

बैठकीच्या सुरवातीस सहमुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, आपल्या मंडळातील उपमुख्य अधिकारी / सहकार कक्ष श्री. साळवे हयांचे शनिवार दि. ०८.१०.२००३ रोजी हृदय विकाराने दुखःद निधन झाले. त्यामुळे सहमुख्य अधिकारी हयांनी सुचविल्यानुसार त्यांना मा. सभापती तसेच सन्मा. सदस्य, उपस्थित अधिकारी व कर्मचारीवर्गाने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली.

मा. सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, श्री. साळवे हयांच्या वयाचा विचार करता ते प्रत्येक काम मोठया हिरीरिने करीत असत. त्यांच्या कुटुंबाच्या दुःखात आपण सर्वजण सहभागी आहोत.

तदनंतर सचिव हयांनी असे प्रतिपादन केले की, मा. उप सचिव, महाराष्ट्र शासन हयांनी त्यांच्या अन्य कार्यालयीन कामांमुळे मंडळाच्या आजच्या बैठकीस उपस्थित राहू शकत नसल्याचे कळविले आहे.

मा सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, मा. सदस्य श्री. कमरुद्दीन मर्चंट हे विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून उभे असल्याने ते आजच्या बैठकीस उपस्थित राहू शकले नाहीत तसेच मा. सदस्य श्री. कमरुद्दीन मर्चंट हे विधान परिषदेची निवडणुक लढवित असल्याने त्यांना मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी मा. सभापती,

मा. सदस्य तसेच उपस्थित अधिकारी/कर्मचारी वर्गातर्फे त्यांना शुभेच्छा दिल्या तसेच मा. सदस्य सर्वश्री. गजेंद्र लष्करी, संजय शिर्के, मोहन देसाई व अबुबकर मुसा बाटलीवाला हे सदस्य पक्ष कार्यामुळे आजच्या बैठकीस उपस्थित राहू शकले नाहीत असे मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी सांगितले.

तदनंतर मा. सभापती हयांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्य व अधिकारी/कर्मचारी वर्गाचे स्वागत करुन बैठकीच्या कामकाजास सुरुवात करण्याच्या सूचना सचिवांना दिल्या. त्यानुसार सचिव हयांनी मा. सभापती, सन्मा. सदस्य व अधिकारी/कर्मचारी वर्गाचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात केली.

----------------------------oo----------------------------

बाब क्रमांक : ९५ / १

विषय- दि. १६.१०. २००३ रोजी संपन्न झालेल्या मंडळाच्या
९४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

सदर कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते ६९ वर सादर करण्यात आला आहे.

मुख्य लेखाधिकारी, दु.व पु. यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पृ.क्र.३१ वरील शेवटच्या परिच्छेदात दोन ठिकाणी लेखा विभागामार्फत असे नमूद करण्यात आले असून त्याऐवजी ऑडीट विभागामार्फत अशी सुधारणा करणे आवश्यक आहे.

कार्यकारी अभियंता/ पु.वि.३ यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पृ.क्र.३९ वर दुस-या परिच्छेदात दोन ठिकाणी " मा. उच्च न्यायालयाने " व " मा. उच्च न्यायालयास " असे नमूद करण्यात आले आहे. त्याऐवजी " मा. नगर दिवाणी न्यायालयाने " व " मा. नगर दिवाणी न्यायालयास " अशी सुधारणा करणे आवश्यक आहे.

तदनुषंगाने मा. सभापती हयांनी अशी विचारणा केली की, फितवाला रोड हया इमारतीच्या पुनर्बांधणीबाबत पुढे काय कार्यवाही करण्यात आली आहे ?

कार्यकारी अभियंता/ पु.वि.३ यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया प्रकरणी मा. नगर दिवाणी न्यायालयात अहवाल सादर करुन त्यांची परवानगी घेतली आहे. त्यानुसार काम सुरु करण्याचे कार्यादेश देण्यात आले असून दि. ०१.११.२००३ पासून प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आली आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे सुचविले की, हया इमारतीच्या पुनर्बांधणीचे काम बरेच दिवस रेंगाळले होते व त्यामुळे त्या विभागातील संबंधित सन्मा. सदस्यांनी हया कामास भेट द्यावी.

वरील सविस्तर चर्चेअंती व सुचविलेल्या सुधारणांसह सदर कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आला.

---------------------oXoXo---------------

बाब क्रमांक : ९५ / २

विषय- नियंत्रण कक्षात प्राप्त झालेल्या संदेशाची माहिती.
(कालावधी दि. २.१०.२००३ ते ७.११.२००३)

------------

सदर माहिती पृ.क्र.७१ ते ७३ वर माहितीसाठी सादर करण्यात आली आहे.

सदर माहितीची नोंद सर्वानुमते घेण्यात आली.

------------------------oo----------------------

दक्षिण परिमंडळ

बाब क्रमांक : ९५.३ (अ)

विषय- सन २००३ च्या पावसाळापूर्व सर्वेक्षणात आढळलेल्या
धोकादायक इमारतींची सद्यःस्थिती.

..................

सदर माहिती पृ.क्र.७५ ते ८१ वर माहितीसाठी सादर करण्यात आली आहे.

उपमुख्य अभियंता/ दक्षिण यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया धोकादायक इमारतींपैकी २३ इमारतींच्या दुरुस्तीसाठी आपण ना हरकत प्रमाणपत्रे प्रदान केली आहेत. परंतु हया इमारती सागरी किनारा नियंत्रणामुळे (CRZ) बाधीत होत असल्याने म.न.पा. कडून परवानगी घेण्याबाबत आग्रह धरीत आहे. त्यामुळे दुरुस्ती कामे हाती घेता येत नाहीत. वास्तविकतः दुरुस्ती कामांमध्ये अशी अट टाकता कामा नये. हयापूर्वी अशाप्रकारची अट टाकली जात नव्हती. त्यामुळे हयाबाबत वरिष्ठ पातळीवर निर्णय घेणे आवयक आहे.

तदनुषंगाने म.न.पा.च्या प्रमुख अभियंत्यांच्या प्रतिनिधीनी असे प्रतिपादन केले की, शासनाच्या नगर विकास विभागाच्या आदेशांनुसार आता वरीलप्रमाणे अट म.न.पा. तर्फे टाकली जाते. ज्याठिकाणी ७५ % टक्क्यापेक्षा अधिक भागांची दुरुस्ती केली जाते अशा प्रकरणात ची परवानगी घेण्याबाबतची अट टाकली जाते.

मंडळाच्या उपस्थित अधिका-यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया प्रकरणात इमारत पाडून पुनर्रचित केली जात नसून जून्या इमारतीची दुरुस्ती केली जाते. त्यामुळे अशा प्रकरणात CRZ ची परवानगी आवश्यक नाही.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे सुचविले की, हयाबाबत उपमुख्य अभियंता (द) हयांनी म.न.पा.च्या मुख्य अभियंत्यांशी व्यक्तीशः चर्चा करुन मार्ग काढावा. आवश्यकता वाटल्यास सन्मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांना सोबत घेऊन चर्चा करावी. तदनंतरही जर म.न.पा. CRZ च्या परवानगीचा हट्‌ट धरीत असेल तर मुख्य अधिकारी, दु.व पु., मा. उपाध्यक्ष/प्रा. हयांच्या स्तरावर मा. म.न.पा. आयुक्त हयांच्याशी पत्रव्यवहार करुन मार्ग काढावा.

सदर माहितीची नोंद सर्वानुमते घेण्यात आली.

---------------------------------oo---------------------------------

<u>बाब क्रमांक : ९५.३ (ब)</u>

विषय- दक्षिण परिमंडळातील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

--------------------------

सदर प्रस्ताव पृ.क्र.८३ ते ८५ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता / दक्षिण विभाग हयांनी असे प्रतिपादन केले की, दरवर्षीप्रमाणे दक्षिण परिमंडळातील धोकादायक इमारतींना दि.१.११.२००३ ते दि. ३१.१०.२००४ हया कालावधीसाठी हया इमारतींना टेकू लावण्याची अंदाजपत्रके तयार करण्यात आली असून त्यानुसार अ. विभागासाठी रु. ५.५३ लक्ष, बी. विभागासाठी रु. ६.०१ लक्ष, डी-१. विभागासाठी रु. ४.१४ लक्ष, डी-२ विभागासाठी रु. २.६४ लक्ष, रक्कमेच्या खर्चास मंडळाची प्रशासकीय मंजूरी आवश्यक आहे. सी १-२ विभागासाठी व सी ३-४ विभागासाठी मंडळाच्या मागील बैठकीत प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

---------------------------------oo---------------------------------

**ठराव क्रमांक : ९५/७६०**

**दक्षिण परिमंडळातील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास दि.१.११.२००३ ते दि. ३१.१०.२००४ हया कालावधीकरिता धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास विभागनिहाय खालीलप्रमाणे प्रशासकीय मंजूरी देण्यात आली.**

| विभाग | मंजूर प्रशासकीय रक्कम रु.लाखात |
| --- | --- |
| अे | ५.५३ |
| बी | ६.०१ |
| डी-१ | ४.१४ |
| डी-२ | २.६४ |
| एकूण : | १८.३२ |

---

बाब क्रमांक : ९५.३ (क)

विषय- इ.क्र.२६० डी, जगन्नाथ शंकर शेठ रोड, मुंबई हया इमारतीतील रहिवाशांच्या गाळयांच्या क्षेत्रफळामध्ये सुधारणा करणेबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.८७ ते ८९ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (द.) हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या दि. ०७.०४.२००३ रोजीच्या बैठकीत मंजूरी दिल्यानुसार सदर इमारतीस म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३) (अ) नुसार प्रमाणपत्र जारी करण्यात आले आहे. सदर ८८ (३) (अ) प्रस्तावामध्ये, एकूण ८ खोल्यांच्या क्षेत्रफळामध्ये सामाईक छन्नमार्गाचे क्षेत्रफळ संबंधित रहिवाशांच्या ताब्यात असूनही ग्राहय धरण्यात आलेले नाही. त्यामुळे हया ८ गाळेधारकांना व्हेकेशन नोटीस बजावल्यानंतर त्यांनी सदर व्हेकेशन नोटीसमध्ये नमूद करण्यात आलेल्या क्षेत्रफळास आक्षेप घेऊन त्यांच्या ताब्यातील सामाईक छन्नमार्गाच्या भागाचेही क्षेंत्रफळ अंतर्भूत करुन त्यानुसार क्षेत्रफळ विचारात घेण्याची विनंती केली आहे. त्यामुळे सदर प्रस्ताव विचारार्थ व निर्णयार्थ मंडळापुढे सादर केला आहे.

मा सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पूर्वीच्या व आताच्या क्षेत्रफळात जवळजवळ १५० टक्के वाढ झाली आहे. सामाईक छन्न मार्गाचा भाग जरी संबंधित रहिवाशांच्या ताब्यात असला तरी त्याचे क्षेत्रफळ मुळ गाळयाच्या क्षेत्रफळामध्ये अंतर्भूत करणे संयुक्तिक वाटत नाही. त्यामुळे हयाबाबत निर्णय घेण्यापूर्वी हया इमारती पाहणी हया विभागातील संबंधित मंडळाच्या २-३ सन्मा. सदस्यांनी करुन त्याबाबतच्या वस्तुस्थितीसह सदर प्रस्ताव मंडळापुढे फेरसादर करावा असे मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी सुचविले.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, सर्वसाधारणतः सामाईक भागाचे क्षेत्रफळ गाळयाच्या क्षेत्रफळामध्ये अंतर्भूत केले जात नाही. एका प्रकरणात असे लक्षात आले आहे की, एक चहाचे दुकान आहे. हया दुकानाच्या पाठीमागील भागामध्ये त्याने पाण्याची भांडी ठेवलेली होती. त्यामुळे त्यांने पाठीमागील भागाचे क्षेत्रफळ दुकानाच्या क्षेत्रफळामध्ये अंतर्भूत करण्याची मागणी केली होती. हयासाठी तो न्यायालयातही गेला होता. परंतु तरीही आपण पाठीमागील भागाचे क्षेत्रफळ दुकानाच्या क्षेत्रफळामध्ये अंतर्भूत केले नाही. अशाप्रकारचा निर्णय घेतल्यास तो धोरणात्मक निर्णय समजला जाईल. त्यामुळे प्रत्यक्ष वस्तुस्थिती तपासून निर्णय घ्यावा लागेल.

कार्यकारी अभियंता/ डी-१ विभाग यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, सामाईक छन्नमार्गाचे क्षेत्रफळ मुळ गाळयाच्या क्षेत्रफळामध्ये अंतर्भूत करता येत नाही हे मान्य आहे. परंतु इमारतीच्या प्रत्यक्ष पाहणीअंती असे दिसून येते की, हे ८ गाळेधारक छन्नमार्गाचा वापर फक्त स्वतःच करीत आहेत व हा छन्नमार्गाचा भाग पूर्णपणे संबंधित गाळेधारकांच्या ताब्यात आहे. त्यामुळे हयाबाबत मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी हयांनी सुचविल्यानुसार हया इमारतीची पाहणी सन्मा. सदस्यांनी करावी.

सविस्तर चर्चेअंती हया इमारतीची पाहणी दोन-तीन सन्मा. सदस्यांनी करुन त्यांच्या अभिप्रायांसह सदर प्रस्ताव मंडळाच्या पुढील बैठकीमध्ये फेरसादर करण्याचे सर्वानुमते ठरले.

-------------------------------oo-------------------------

<u>बाब क्रमांक : ९५.३ ( ड )</u>

विषय- दक्षिण परिमंडळातील जुन्या व मोडकळीस उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

-----------------------------------------

सदर प्रस्ताव पृ.क्र. ९१ ते १६७ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (द.) हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, दक्षिण परिमंडळातील ए. विभागातील २, बी. विभागातील ६, सी१-२ विभागातील ८, सी३-४ विभागातील ५, डी-१ विभागातील ४ व डी-२ विभागातील ५ अशा एकूण ३० उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मूळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत. मा. अध्यक्षांचे परवानगीने आयत्यावेळी १ अंदाजपत्रक सादर करण्यात आले.

मा.सदस्य श्री. सचिन सावंत हयांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, इमारत दुरुस्तीसाठी हाती घेताना आपण काय निकष लावतो. पावसाळापूर्व सर्वेक्षणानुसार जर इमारती दुरुस्तीसाठी हाती घेतल्या जात असतील तर पावसाळापूर्व सर्वेक्षणात किती इमारती दुरुस्तीसाठी हाती घेणे आवश्यक होते. त्यापैकी किती इमारतींची दुरुस्ती पूर्ण करण्यात आली आहे व अद्याप किती इमारतींची दुरुस्ती पूर्ण करावयाची आहे हयाबाबतची माहिती सर्वेक्षणात अहवालानुसार मंडळापुढे सादर करावी.

उपमुख्य अभियंता (द.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, दैनंदिन निरिक्षण, पावसाळापूर्व निरिक्षण तसेच रहिवाशी, समाजसेवक, मा. नगरसेवक, आमदार, मा. खासदार यांच्या तक्रारीनुसार इमारतींची पाहणी मंडळांच्या अधिका-यांमार्फत केली जाते. पाहणी केल्यानंतर सदर इमारतीच्या दुरुस्तीसाठी " पटणी कमिटी " निकषांनुसार किती गुणांक प्राप्त होतात त्यानुसार इमारतींच्या दुरुस्ती कामांची प्राधान्य यादी तयार केली जाते व प्राधान्यानुसार इमारती दुरुस्तीसाठी हाती घेतल्या जातात. पटणी कमिटी निकषांनुसार इमारतीच्या दुरुस्तीसाठी सर्वसाधारणतः ५० टक्के गुणांक व संरचनात्मक दुरुस्तीसाठी ७० टक्के गुणांक प्राप्त होत असतील तर अशी इमारत दुरुस्तीसाठी हाती घेण्यात येते. तसेच दरवर्षी दुरुस्ती कामांचे कार्यक्रम अंदाजपत्रक (Budget Estimate) तयार केले जाते त्यानुसार सर्वसाधारणतः दरवर्षी ६०० इमारतींच्या दुरुस्तीची कामे दक्षिण परिमंडळामार्फत हाती घेतली जातात. हयामध्ये सर्वसाधारणः ३०० इमारतींची दुरुस्ती कामे पूर्ण केली जातात व ३०० इमारतींची नवीन कामे हाती घेतली जातात. सर्वेक्षण अहवालामधून निश्चित कोणती माहिती सन्मा. सदस्याना हवी आहे हयाचा बोध होत नाही. त्यामुळे त्यांनी प्रथम विभागीय कार्यालयामध्ये येऊन सर्वेक्षण पाहून त्यानुसार त्यांना हवी असलेली माहिती सांगितल्यास त्यांना ती देण्यात येईल.

सविस्तर चर्चेअंती दक्षिण परिमंडळातील एकूण ~~३०~~ ३१ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ नुसार प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ९५ / ७६१**

**दक्षिण परिमंडळातील एकूण ~~३०~~ ३१ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.**

-----------ooo-----------

<u>उत्तर परिमंडळ</u>

<u>बाब क्रमांक : ९५.४ (अ)</u>

विषय- अनुपालन अहवाल व उत्तर परिमंडळातील सन २००३ च्या पावसाळापूर्व पाहणीत धोकादायक म्हणून घोषित केलेल्या इमारतींची सद्यःस्थिती.

........................

सदर माहिती पृ.क्र.१६९ ते १७५ वर माहितीसाठी सादर करण्यात आली आहे.

तदनुषंगाने कार्यकारी अभियंता/ ई.विभाग हयांनी असे प्रतिपादन केले की,. पृ.क्र. १७५ वर धोकादायक इमारतींच्या सद्यःस्थितीची माहिती सादर करण्यात आली असून इ.क्र.२९९ अ, २९९ ब, बोटावाला चाळीतील ६० % ते ७८ % रहिवाशांना व्हेकेशन नोटीस दिलेल्या आहेत. इमारत रिकामी करुन घेण्याच्या दृष्टीने इतर रहिवाशांना प्रत्यक्ष भेटून व्हेकेशन नोटीसा घेऊन जाण्याची अनेकदा विनंती करण्यात आली आहे. झोपडपट्टी सुधार मंडळाचे मा. सदस्य श्री. सुरेश अपराध हे शनिवारी आले होते तेव्हा त्याच दिवशी ४.०० वा. बैठक घेऊन इ.क्र.२९९-अ मधील रहिवाशांना जागा खाली करण्याची विनंती करण्यात आली होती. हया बैठकीत सदर इमारतीतील रहिवाशांनी असे सांगितले की, त्यांना एकाच ठिकाणी संक्रमण शिबीरात गाळे देण्याबाबतची विनंती मा. सभापती महोदयांना केली आहे. त्यामुळे गाळे खाली करण्यास थोडा वेळ द्यावा अशी विनंती हया इमारतीतील रहिवाशांनी केली आहे. तसेच इ.क्र.२९९-ब मधील रहिवाशांना बैठकीसाठी प्रांगणात बोलाविले होते. मात्र सदर इमारतीतील रहिवाशांनी त्यांना इमारतीत बोलावून घेतल्यानंतर स्टम्पस् व बॅटने प्राणघातक हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र मा. सदस्य श्री. सुरेश अपराध व इतर काही रहिवाशांनी सदर प्राणघातक हल्ल्यातून वाचविले. त्यामुळे मंडळाचे अधिकारी रहिवाशांचे प्राण वाचविण्याचा प्रयत्न करीत असताना मंडळाच्या अधिका-यांवरच रहिवाशांकडून प्राणघातक हल्ला होतो हयाची मंडळाने कृपया नोंद घ्यावी.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की,.प्राणघातक हल्ल्यानंतर पोलीस तक्रार करणे आवश्यक होते. तदनुषंगाने का.अ./ई. विभाग हयांनी असे प्रतिपादन केले की, मा. सदस्य श्री. सुरेश अपराध हयांनी सांगितल्यानुसार पोलीस तक्रार केली नाही. हया रहिवाशांचे म्हणणे असे आहे की, त्यांना एकाच ठिकाणी संक्रमण गाळे न देता इमारतीतील गाळे खाली करण्यास सांगितले जाते.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीतील रहिवाशांबरोबर जेव्हा बैठक घेण्यात आली होती तेव्हा कोणत्या संक्रमण शिबीरात किती गाळे उपलब्ध आहेत हयाची माहिती रहिवाशांना देऊन त्यांना सर्वांना एकाच ठिकाणी संक्रमण गाळे देता येणे शक्य नाही असे

सांगितले होते. मा. सभापती हयांनी अशी विचारणा केली की, संक्रमण शिबीरामध्ये कोणत्या ठिकाणी किती गाळे उपलब्ध आहेत याची माहिती सादर करावी.

**मिळकत व्यवस्थापक** (सं.गा.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, निर्मळ नगर- २, **गोरेगाव- ११, महावीर नगर, कांदिवली** - ९, मालवणी जूनी- ५, मालवणी नवीन-१, गोराई रोड, **बोरिवली**- ४०, मागाठाणे-५, शिवडी-४, सहकार नगर, चेंबूर-१, मानखुर्द जूने- ४, सायन- २६, पंतनगर,घाटकोपर- २१, कॅनरा इंजिनियरिंग, घाटकोपर-२, कन्नमवार नगर- ४०, वडाळा- ३, मुलूंड- १४, कुर्ला- १ असे एकूण २५९ गाळे संक्रमण शिबीरात उपलब्ध आहेत.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, सायन येथे बहुमजली इमारतीतील संक्रमण गाळे मंडळाच्या ताब्यात आले नाहीत का ? हया गाळयांचे वाटप परस्पर अन्य व्यक्तींमार्फत केले जात असल्याची तक्रार आहे ही वस्तुस्थिती आहे का ?

मिळकत व्यवस्थापक (सं.गा.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, सायन येथे बांधलेल्या बहुमजली संक्रमण शिबीरातील गाळे जून्या वसाहती पाडून त्यातील रहिवाशांना दिले जातात. हया गाळयांच्या चाव्या शिर्के कंपनीच्या माणसांच्या ताब्यात असून त्या त्यांच्या माणसांमार्फत जून्या वसाहतीतील रहिवाशांना हलविण्यासाठी दिल्या जातात. हया गाळयांच्या चाव्या शिर्के मंडळाकडे सुपूर्द करण्याबाबत अनेकदा विनंती करुनही शिर्के कंपनीच्या माणसांनी चाव्या मंडळाच्या ताब्यात दिलेल्या नाहीत.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया बहुमजली इमारतीतील संक्रमण गाळयांच्या चाव्या परस्पर रहिवाशांनादेऊ नयेत अशी स्पष्ट कल्पना शिर्के कंपनीच्या कर्मचा-यांना द्यावी तसेच त्यांना अशीही स्पष्ट कल्पना देण्यात यावी की, त्यांनी जर संक्रमण गाळयांच्या चाव्या परस्परर रहिवाशांना दिल्या तर त्याची सर्वस्वी जबाबदारी त्यांची राहील व मंडळाचा त्याच्याशी संबंध राहणार नाही. शिर्के कंपनीचे कर्मचारी वा अन्य व्यक्ती ज्या रहिवाशांना संक्रमण गाळयांच्या चाव्या देत आहेत ते रहिवाशी अधिकृत आहेत किंवा नाहीत हयाचीही तपासणी केली जात नाही. घुसखोर व्यक्तींनाही सदर संक्रमण शिबीरातील गाळयांच्या चाव्या देत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्या रहिवाशांना अशा संक्रमण गाळयांच्या चाव्या दिल्या जात आहेत त्यांच्याकडे व्हेकेशन नोटीस किंवा इतर वैध कागदपत्रे आहेत किंवा नाहीत हयाची छाननी चावी देण्यापूर्वी होणे आवश्यक आहे.

उपमुख्य अधिकारी व सहमुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने मिळकत व्यवस्थापक (सं.गा.) हयांना असे आदेश दिले की, जोपर्यंत मंडळाकडून संबंधित गाळेधारकांस गाळा वितरण आदेशपत्र दिले जात नाही तोपर्यंत संबंधित गाळयाची चावी रहिवाशांना न देण्याबाबतची सूचना शिर्के कंपनीच्या कर्मचा-यांना व इतर संबंधितांना त्वरित द्यावी.

मिळकत व्यवस्थापक (सं.गा.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, गाळे वितरणाचे आदेश कागदपत्रांची छाननी करुन मंडळामार्फतच दिले जातात. मात्र गाळयांच्या चाव्या शिर्के कंपनीच्या कर्मचा-यांकडून दिल्या जातात. त्यांना अनेकदा सांगूनही ते गाळयांच्या चाव्या मंडळाकडे सुपूर्द करीत नाहीत.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, वास्तविक बहुमजली इमारतीतील संक्रमण गाळे प्रथम मंडळाकडे सुपूर्द करणे आवश्यक आहे. मात्र तसे न करता परस्पर गाळयांचे वाटप केले जात आहे जे अगदी चुकीचे आहे. त्यामुळे हे सर्व गाळे प्रथम मंडळाच्या ताब्यात घ्यावेत व तोपर्यंत अशा गाळयांच्या वाटपास त्वरित स्थगिती द्यावी असे आदेश मा. सभापती हयांनी दिले.

मा. सभापती हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, जून्या बैठया चाळी पाडून त्याठिकाणी आपण बहुमजली इमारत बांल्या आहेत. त्यामुळे पूर्वीपेक्षा जास्त प्रमाणात संक्रमण गाळे उपलब्ध झाले असावेत. हयामध्ये बैठया चाळीतील रहिवाशांना नवीन गाळयांत विस्थापित करुन अतिरिक्त झालेले गाळे सद्यः रिक्त असावेत जे एकत्रितपणे इ.क्र.२९९-अ व ब, बोटावाला चाळ हया इमारतीतील रहिवाशांना देता येऊ शकतील का ? हे तपासणे आवश्यक आहे. आता मंडळापुढे जी माहिती सादर करण्यात आली आहे त्यामध्ये प्रतिक्षा नगर, सायन येथील गाळयांची माहिती दिलेली नाही. त्यामुळे मा. सभापती हयांनी अशी विचारणा केली की, प्रतिक्षा नगर, सायन येथे किती अतिरिक्त उपलब्ध झालेले गाळे रिक्त आहेत ?

मिळकत व्यवस्थापक (सं.गा.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, सायन येथील बहुमजली इमारतीत एकूण १००० संक्रमण गाळे बांधण्यात आले आहेत. सहमुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया १००० गाळयांमध्ये जून्या बैठया चाळीतील ७०० ते ७५० रहिवाशांना विस्थापित करण्यात आले आहे. हयाव्यतिरिक्त जे २०० संक्रमण गाळे एक वर्षासाठी मुंबई मंडळाकडून घेण्यात आले होते ते त्यांना परत करण्यात आले असून हया गाळयांमधील रहिवाशांचे पुनर्वसन हया १००० गाळयांमधील गाळयांत करण्यात आले आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया गाळयांमध्ये बैठया चाळीतील रहिवाशांचे पुनर्वसन करताना ज कोणी अनधिकृत/घुसखोर रहिवाशी असतील त्यांना गाळे देऊ नयेत. अशा रहिवाशांचे पुनर्वसन केल्यानंतर जे काही अतिरिक्त रिक्त गाळे उपलब्ध होत असतील ते आपण इतर रहिवाशांना गरजेनुसार वाटप करणे आवश्यक आहे.

सहमुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, जून्या बैठया चाळीतील रहिवाशांचे पुनर्वसन करताना आपण संबंधित रहिवाशी अनधिकृत/घुसखोर आहे किंवा नाही हयाची छाननी केली जात आहे तसेच बैठया चाळीतील रहिवाशांचे पुनर्वसन केल्यानंतर जे अतिरिक्त रिक्त गाळे उपलब्ध होत आहेत त्यांचे वाटप आपण अन्य इमारतीतील रहिवाशांनाही करीत आहोत.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे सुचविले की, आतापर्यंत ज्या अशा गाळयांचे वाटप झाले आहे त्या गाळयांमधील रहिवाशांच्या कागदपत्रांची छाननी करावी व त्याबाबतची माहिती मुख्य अधिकारी हयांच्या नजरेस आणून नंतरच गाळे वाटप करावे.

सहमुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हे गाळे प्रथम मंडळाच्या ताब्यात घेऊन त्याचे नियमानुसार वाटप करण्याचे आदेश संबंधित अधिका-यांना त्वरित देण्यात येतील. तदनंतरच अशा गाळयांचे वाटप केले जाईल.

कार्यकारी अभियंता, ई.विभाग हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, बोटावाला चाळीतील रहिवाशांना एकाच ठिकाणी संक्रमण गाळे न दिल्याने ते आक्रमक बनून त्याचा उद्रेक मंडळाच्या त्यांच्यासारख्या अधिका-यांवर झाला आहे.

मा. सदस्य श्री. रमेश परब हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, गॅस कपनी लेन, लालबाग येथे संक्रमण शिबीर गाळयांची इमारत बांधण्यात आली आहे. हया इमारतीतील गाळे बोटावाला चाळीतील रहिवाशांना देता येऊ शकतील का हयाबाबत विचार करणे आवश्यक आहे असे वाटते.

मा.सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, गॅस कंपनी लेन येथील सर्व गाळे बोटावाला चाळीतील रहिवाशांना देता येणार नाहीत. काही इमारतीतील काही रहिवाशांनी जे समितीचे सदस्य वा प्रमुख आहेत त्यांनी हया इमारतीची देखरेख करावयाची असल्याने अशाच रहिवाशांना हे गाळे देण्याचा निर्णय जानेवारीच्या पहिल्या आठवडयात घेण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती अनुपालन अहवालाची व धोकादायक इमारतींच्या सद्यःस्थितीच्या माहितीची नोंद सर्वानुमते घेण्यात आली.

--------------------oo--------------------

<u>बाब क्रमांक : ९५.४ (ब)</u>

विषय- उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशाकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

----------------------------------

सदर प्रस्ताव पृ.क्र. १७७ ते २४१ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी असे प्रतिपादन केले की, उत्तर परिमंडळातील ई.[व फ ग(इ)] विभागातील [प्रत्येकी] ५ व फ्रा/ऊ विभागातील ११ अशा एकूण २१ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांची मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत. हयाशिवाय मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयात उत्तर परिमंडळातील एकूण

०४ इमारतींच्या दुरुस्ती कामांची मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत.

पृ.क्र.२०७ वर सादर करण्यात आलेल्या इ.क्र.३६-बी, सरस्वती बिल्डिंग, ना.म.जोशी मार्ग हया इमारतीच्या चौथ्या टप्प्याच्या अंदाजपत्रकाची एकूण रक्कम रु.१४,६०,३३४/- ऐवजी रु. १६,७७,०६४/- अशी वाचावी. तसेच दर चौ.मी.खर्च हा रु.१०१३ ऐवजी रु.११६४.४० चौ.मी. असा वाचण्यात यावा.रु.१०००/- प्रति चौ.मी. जादा रक्कम रु.२.३६ लक्ष रहिवाशांनी मंडळाकडे जमा केलेले आहेत. मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीच्या दुरुस्तीसाठी त्यांच्या आमदार निधीतून निधी देण्यात आला आहे असे वाटते. त्यामुळे हया इमारतीच्या दुरुस्तीच्या कामास सुरुवात करण्यापूर्वी आमदार निधी नेमका कोणत्या भागाच्या दुरुस्तीसाठी दिला आहे हयाची शहानिशा करावी अन्यथा आमदार निधी निष्कारण वाया जाईल.

उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, पृ.क्र.२१५ सादर केलेल्या इ.क्र.२१-ई, पाध्येवाडी, बी.एस.रोड, दादर हया इमारतीत फक्त १ अनिवासी भाडेकरु आहे. म्हाड अधिनियम १९७६ च्या तरतुदीनुसार संपूर्ण इमारत जर अनिवासी वापराची असेल तर अशी इमारत दुरुस्ती उपकरातून वगळण्यास पात्र ठरते. हया इमारतीमध्ये एक गाळा आह ही इमारत दुरुस्त केल्यानंतर ती दुरुस्ती उपकरातून वगळून घेण्याबाबत म.न.पा.ला कळविणे आवश्यक आहे. हयास मंडळाची परवानगी आवश्यक आहे.

सविस्तर चर्चेअंती उत्तर मंडळातील एकूण २५ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/ सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

---------------------------------------oo---------------------------------------

<u>ठराव क्रमांक : ९५ / ७६२</u>

**उत्तर परिमंडळातील एकूण २५ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मूळ / सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. इ.क्र.३६-बी, सरस्वती बिल्डिंग, ना.म.जोशी मार्ग हया इमारतीच्या दुरुस्तीचे काम सुरु करण्यापूर्वी मंडळामार्फत व आमदार निधी अंतर्गत घेतलेल्या कामाची शहानिशा करावी तसेच इ.क्र.३१, पाध्येवाडी, बी.एस.रोड, दादर हया इमारतीची दुरुस्ती पूर्ण झाल्यानंतर सदर इमारत दुरुस्ती उपकरातून वगळण्याबाबत म.न.पा.ला कळविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.**

----------------oooo---------------

<u>पुनर्रचना विभाग :-</u>

<u>बाब क्रमांक : ९५.५ (अ)</u>

विषय- अनुपालन अहवाल

---

सदर अनुपालन अहवाल पृ.क्र. २४३ वर माहितीसाठी सादर करण्यात आला आहे.

सदर अनुपालन अहवालाची नोंद सर्वानुमते घेण्यात आली.

----------------oooo----------------

<u>बाब क्रमांक : ९५.५ (ब)</u>

विषय- इ.क्र.४१ बी ते ४१ एच, बदक चाळ, (समर्थ हनुमान पथ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, चिंचपोकळी,ई.विभाग भूकर पाहणी क्र.७९८, माझगाव विभाग हया इमारतीच्या संयुक्त पुनर्बांधणी कामास सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

---

सदर प्रस्ताव पृ.क्र. २४५ ते २५३ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाने हया इमारतीची पुनर्बांधणी योजना कार्यान्वित केली असून सदर पुनर्बांधणी योजनेच्या रु.३४८.०० लक्ष खर्चास दि. २.१२.९५ रोजी प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे. आता जागा मंडळाच्या ताब्यात आली असून नवीन धोरणांनुसार बांधकाम साहित्याचा वापर करून अंदाजपत्रक सुधारित करण्यात आले आहे. त्यानुसार या योजनेचा खर्च रु. ६,३६,७६,०५०/- आहे. हया मंडळाची प्रशासकीय मंजूरी आवश्यक आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर पुनर्बांधणी योजनेस सुधारित प्रशासकीय मंजुरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

<u>ठराव क्रमांक : ९५ / ७६३</u>

**इ.क्र.४१ बी ते ४१ एच, बदक चाळ, (समर्थ हनुमान पथ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, चिंचपोकळी,ई.विभाग भूकर पाहणी क्र.७९८, माझगाव विभाग येथील पुनर्बांधणी योजनेच्या रु. ६,३६,७६,०५०/- खर्चास प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.**

-------------oo-------------

बाब क्रमांक : ९५.६

विषय- म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम १०३ (ब) नुसार नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थांचे प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास मंजूरी देण्याबाबत.

---

म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम १०३ (ब) नुसार नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थांचे खालील ४ प्रस्ताव भूसंपादनाच्या मंजूरीसाठी शासनाकडे सादर करण्यास मंजूरी देण्याबाबत पृ.क्र.२५५ ते २९९ वर सादर करण्यात आले आहेत.

१) रबिया हाऊस, २०, हॉस्पिटल लेन, माझगाव,मुंबई-१० येथील भूखंड वा त्यावरील इमारतीस नियोजित मदिना मंझील स.गृ.नि.संस्थेकरिता कलम १०३-ब अन्वये भूसंपादन करण्याचे प्रस्तावास शासनाकडे सादर करण्यासाठी मंडळाची मंजूरी मिळणेबाबत.

२) एच.वि.बिल्डिंग, २७६-२७८, सॅम्युएल स्ट्रीट, वडगाडी, मुंबई-३ येथील भूखंड वा त्यावरील इमारतीस नियोजित वेलफेअर चेम्बर्स स.गृ.नि.संस्थेकरिता कलम १०३-ब अन्वये भूसंपादन करण्याचे प्रस्तावास शासनाकडे सादर करण्यासाठी मंडळाची मंजूरी मिळणेबाबत.

३) ग्रेट वेस्टर्न बिल्डिंगस् १३०-१३२, अपोलो स्ट्रीट, ९-२३, २३-२३ए व ३७ बेक हाऊस लेन, काळा घोडा, मुंबई-१ येथील भूखंड वा त्यावरील इमारतीस नियोजित ग्रेट वेस्टर्न बिल्डिंगस् स.गृ.नि.संस्थेकरिता कलम १०३-ब अन्वये भूसंपादन करण्याचे प्रस्तावास शासनाकडे सादर करण्यासाठी मंडळाची मंजूरी मिळणेबाबत.

४) बुगडे वाडी, २७२-२७४, वीर सावरकर मार्ग, शिवाजी पार्क, दादर (पश्चिम) मुंबई-२८ येथील भूखंड वा त्यावरील इमारतीस नियोजित श्री दत्त छाया स.गृ.नि.संस्थेकरिता कलम १०३-ब अन्वये भूसंपादन करण्याचे प्रस्तावास शासनाकडे सादर करण्यासाठी मंडळाची मंजूरी मिळणेबाबत.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उप अभियंता/सहकार संस्था कक्ष हयांनी असे प्रतिपादन केले की, हया सर्व प्रस्तावांमध्ये किमान ७० टक्के रहिवाशांची संमती असून म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम १०३ (ब) नुसार भूसंपादनाच्या प्रस्तावास शासनाची मंजूरी घेण्यासाठी सदर प्रस्ताव शासनास सादर करण्यास मंडळाच्या मंजूरीची आवश्यकता आहे.

सविस्तर चर्चेअंती विषयांकित चार इमारतींचे प्रस्ताव शासनाकडे भुसंपादनाच्या मंजुरीसाठी सादर करण्यास मंजुरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ९५ / ७६३**

**म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम १०३ (ब) नुसार खालील तीन इमारतींच्या नियोजित स.गृ.नि. संस्थांचे खालील ४ प्रस्ताव भूसंपादनाच्या मंजूरीसाठी शासनाकडे पाठविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.**

**१) रबिया हाऊस, २०, हॉस्पिटल लेन, माझगाव,मुंबई-१० येथील मदिना मंझील स.गृ.नि.संस्था.**
**२) एच.वि.बिल्डिंग, २७६-२७८, सॅम्युएल स्ट्रीट, वडगाडी, मुंबई-३ येथील मुंबई येथील वेलफेअर चेम्बर्स स.गृ.नि.संस्था.**
**३) ग्रेट वेस्टर्न बिल्डिंगस् १३०-१३२, अपोलो स्ट्रीट, ९-२३, २३-२३ए व ३७ बेक हाऊस लेन, काळा घोडा, मुंबई-१ येथील ग्रेट वेस्टर्न बिल्डिंगस् स.गृ.नि.संस्था.**
**४) बुगडे वाडी, २७२-२७४, वीर सावरकर मार्ग, शिवाजी पार्क, दादर (पश्चिम) मुंबई-२८ येथील श्री दत्त छाया स.गृ.नि.संस्था**

-----------oo-----------

बाब क्रमांक : ९५.७

मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी ठेवावयाचे विषय

१) विषय- इ.क्र.५८,६०,६४,६६,कामाठीपूरा, १३ वी गल्ली, ई.विभाग, भूखंड पाहणी क्र.३७८, १/३७८, ३७९, ३८०, भायखळा विभाग येथील संयुक्त पुनर्बांधणी योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

........................

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयामध्ये पटलावर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतींची संयुक्त पुनर्बांधणी योजना मंडळाने हाती घेतली असून नियोजित इमारतीच्या नकाशांना म.न.पा.ने दि.२२.११.२००२ रोजी मंजूरी दिली आहे. जून्या इमारतीतील ४४ निवासी + १ अनिवासी = ४५ गाळयांऐवजी नवीन इमारतीत ३५ निवासी + १ अनिवासी = ३६ गाळे बांधण्याचे प्रस्तावित आहे. हया योजनेचा अपेक्षित खर्च रु.९४,५८,११७/- असून त्यास मंडळाची प्रशासकीय मंजूरी आवश्यक आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर पुनर्बांधणी योजनेस प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ९५ / ७६४**

